# ॥ श्रीगुरुचरित्र शब्दार्थ चर्चा ॥

## अध्याय तिसरा अंबरीषव्रतनिरुपण

**नमस्कार,**

श्रीगुरुचरित्रातील ओव्यांचा योग्य अर्थ प्रयत्न :-

वाचकांनी आपली समर्पक मते कारणमीमांसेसहित

pratisaadasg@gmail.com वर

आपल्या नाव पत्त्यासहीत कळवावीत ही विनंती.

कळावे,

'श्रीगुरुचरित्र आशय – निधी'

**ओवी क्रमांक : २३ ,४३ , ५१**

# ॥श्रीगुरुचरित्र शब्दार्थ चर्चा॥

अध्याय तिसरा                                        ओवी क्रमांक  २३

## ओवी :

जी! मी संसारसागरीं । बुडालों तापत्रयपूरीं।

भक्षिलें क्रोधादि जलचरीं । अज्ञानजाळें वेष्टिलों॥ २३ ॥

## गद्यरुप :

"जी! मी संसारसागरातील काम, क्रोध आणि लोभ या तीन गोष्टींच्या तापदायक नगरात  बुडालो. क्रोध इत्यादिला जलचरांप्रमाणे  मी भक्षण केले.(या जगात काम, क्रोध आणि लोभ या तीन गोष्टींचे मी इतर सर्वांसारखे सेवन केले.) अज्ञानरुपी जाळ्यात मी पूर्णपणे  वेढलो गेलो.

**शब्दार्थ :** जलचर= पाण्यात फिरणारा  प्राणी

जी= हाकेला उत्तर देण्याचा प्रकार   वेष्टणे= वेढणे

भक्षिलें क्रोधादि जलचरीं या ओळीच्या अर्थानुसार तापत्रय ह्या शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणे घ्यावा लागेल,

तापत्रयपूरी=ताप +त्रय(तीन)+ पूरी(नगरी)=  काम, क्रोध आणि लोभ या तीन गोष्टींच्या तापदायक  नगरात

पुढे पहावे

# ॥ श्रीगुरुचरित्र शब्दार्थ चर्चा ॥

## अध्याय तिसरा ओवी क्रमांक २३

## शब्दकोशातील अर्थ :-

तापत्रय = आध्यात्मिक (धार्मिक), आधिभौतिक (प्राण्यापासून झालेले) व आधिदैविक (देवकृत) अशा तीन प्रकारच्या पीडा.

**या तीनही पीडा सर्वांना कमी जास्त प्रमाणात होतात, म्हणूनच आपण कोणत्याही कार्याचा आरम्भ करण्यापूर्वी शान्तिपाठ म्हणतो.**

काम, क्रोध आणि लोभ यांच्याकडे आपला ओढा कमी करणे हे प्रत्येकाच्या प्रवृती आणि निवृत्ती यांच्या संतुलनावर अवलंबून असते.

------------------------------------------------------------------------------------------------

पुढे पहावे

# ॥ श्रीगुरुचरित्र शब्दार्थ चर्चा ॥

अध्याय तिसरा ओवी क्रमांक ४३

## ओवी :

हिंडत आलों राकळ क्षिति । नव्हे कवणा ऐशी मति ।

गुरुचरित्र न पुसती । तूंते देखिलें आजि आम्हीं ॥ ४३ ॥

## गद्यरुप :

मी सर्व पृथ्वी हिंडून आलो. कोणालाही अशी बुध्दी झाली नाही . गुरुचरित्र कोणी विचारले नाही. आज आम्ही तुझ्यात ती (बुध्दी )पाहिली.

## शब्दार्थ :

मति= बुध्दी

राकळ = ह्या शब्दाचा अर्थ शब्दकोशात मिळालेला नाही.

**वाचकांना आवाहन :** आपल्याला राकळ ह्या शब्दाचा योग्य अर्थ माहित असल्यास आपल्या नाव पत्त्यासह pratisaadasg@gmail.com ह्या मेल आय.डी.वर कळावावा ही विनंति.

पुढे पहावे

# ॥ श्रीगुरुचरित्र शब्दार्थ चर्चा ॥

अध्याय तिसरा　　　　ओवी क्रमांक ५१

## ओवी :

**सिद्ध म्हणे नामधारका। त्रयमूर्तींचे तीन गुण ऐक।**

**अदिवस्तु आपण एक । प्रपंच मूर्ति तीन जाण ॥ ५१ ॥**

## शब्दार्थ :

त्रयमूर्ती=त्रय(तीन) + मूर्ती　　अदि=?　अदा= उत्पन्न

प्रपंच=जग　मूर्ती= मूर्त= साक्षात= प्रत्यक्ष　वस्तु= नाटकाचे कथानक

शब्दकोशातील शब्दशः अर्थानुसार मिळणारे **गद्यरुप** अयोग्य वाटते.

सिद्धमुनी नामधारकाला म्हणाले,"तीनमूर्तिंचे तीन गुण ऐक. कथानकात आपण एक (तीनही मूर्ति ह्या एक व्यक्ती )म्हणून उत्पन्न झालेला आहात. जगात प्रत्यक्ष तीनही वेगवेगळे आहेत, हे जाण.

(कारण पुराणातील श्रीदत्तगुरु जन्मकथेनुसार श्रीदत्तात्रेय ही एक व्यक्ती आहे. म्हणून अदि हा शब्द अदा म्हणजे उत्पन्नचे काव्यरुप असावे असे वाटते . तसेच वस्तु ह्या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ नाटकाचे कथानक असा आहे.)

पुढे पहावे

# ॥ श्रीगुरुचरित्र शब्दार्थ चर्चा ॥

अध्याय तिसरा ओवी क्रमांक ५१

संस्कृत मध्ये अदि शब्द नाही पण आदि शब्द आहे. आदि म्हणजे कालक्रमणेत प्रथम गणना.

श्रीमद् भगवद् गीतेतील संदर्भानुसार,

**न मे विदुः सुरगणाः प्रभवम् न महर्षयः ।**
**अहम् आदिः हि देवानाम् महर्षीणाम् च सर्वशः ॥ १० -२ ॥**

**देवगणांना आणि महर्षींना माझ्या उत्पत्तीचे ज्ञान नाही, कारण देवांचे व महर्षींचे सर्वप्रकारे मीच आदिकारण आहे .**

In Vedant Philosophy it is called as "Causeless Cause".

**ह्यावरुन अदिवस्तु ह्या शब्दाचा अर्थ 'परब्रह्म एक आहे' असा घ्यावा लागेल.**

शब्दशः अर्थापेक्षा खालील अर्थ (गद्यरुप) सुयोग्य वाटतो.

सिद्धमुनी नामधारकाला म्हणाले, "तीनमूर्तिंचे तीन गुण ऐक. आपण एक (परब्रह्म) आहात. जगात प्रत्यक्ष तीनही वेगवेगळे आहेत, हे जाण.